**नियमित फौजदारी खटला क्र. ९०/२०१७**

**अभियोग साक्षीदार क्र.३**

**निशाणी क्र.९७**

शपथेवर कथन करते की,

नाव – **संजय जयराम जामदार**

वय – ५५ वर्षे, कामधंदा – शेती

रा. – जामदार वस्ती, धोत्रा, ता. कोपरगाव, जि.अ.नगर.

**सरतपास– अभियोगपक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री. पी. डी. रणधीर –**

१. फिर्यादी व आरोपी हे दोघे माझ्या शेजारी राहतात. दिनांक २८.१०.२०१६ रोजी सकाळी ७.०० वाजताच्या दरम्यान तुकाराम जामदार यांच्या घरासमोर घटना घडली होती. सखाराम जयराम जामदार व तुकाराम जयराम जामदार यांच्यामध्ये मारामारी सुरु होती. सदरचे भांडण आम्ही सोडविण्यास गेलो. सखाराम जामदार यांना भिमाबाई व तुकाराम जामदार यांनी धरुन ठेवले होते. अशोक याच्या हातात काठी होती. अशोकची पत्नी मिनाबाई ही देखील मारहाण करत होती. सदरचे भांडण आम्ही सोडविले. त्यावेळी तेथे अनिल रावसाहेब जामदार हा तेथे हजर होता. त्याने गावातील एक चारचाकी वाहन बोलाविले. त्यामध्ये सखाराम जामदार यांना टाकुन दवाखान्यात नेण्यात आले. सखाराम जामदार याने त्याच्या हातातील काठीने अशोक जामदार यांच्या डोक्यात तसेच त्यांची आई भिमाबाई यांच्या कपाळावरती मारहाण केली असे काही घडले नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करित नसल्याने सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदारास फितुर घोषित करण्यात येवुन उलटतपासाच्या स्वरुपातील प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

२. सखाराम जामदार याने त्याच्या हातातील काठीने अशोक जामदार यांच्या डोक्यात तसेच त्यांची आई भिमाबाई यांच्या कपाळावरती मारहाण केली

हे म्हणणे खरे नाही. कैलास जामदार, सतिष जामदार, अनिल जामदार, भास्कर जामदार, अरुण जामदार व रावसाहेब जामदार हे देखील तेथे आले व त्यांनी मिनाबाई व भिमाबाई यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व धमकी दिली हे म्हणणे खरे नाही. अशोक याने सदर घटनेबाबत आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

३. पोलीसांनी माझ्याकडे घटनेबाबत चौकशी करुन माझा जबाब नोंदविला होता हे म्हणणे खरे आहे. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग–अ वाचुन दाखविला. तो माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर नाही. पोलिसांनी माझ्या जबाबामध्ये तसे का नमुद केले आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. फिर्यादी व आरोपी हे माझ्या भावकीतील आहेत हे म्हणणे खरे आहे. आरोपींशी माझे चांगले संबंध आहेत हे म्हणणे खरे आहे. पोलिसांनी माझा जबाब माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदवुन घेतला होता हे म्हणणे खरे नाही. आरोपींना वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास – आरोपींतर्फे श्री. जे. ए. जोशी वकील साहेब –**

४. अशोक जामदार हे सखाराम जामदार यांना मारहाण करत होते हे म्हणणे खरे नाही. मला पोलिस स्टेशनमध्ये जाण्याचा प्रसंग आलेला नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR
Digitally signed by SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR
Date: 2026.04.21 15:19:15 +0530

(संजय छ. खैरनार)

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोपरगाव, जि. अहमदनगर.

कोपरगाव.

दिनांक – २१.०४.२०२६